■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ३० ● मंगळवार, दि. १० ते १७ डिसेंबर २०२४ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू



## तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात महामानवांना अभिवादन

रिसोड : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय रिसोड येथे अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामहरी बेले, आरोग्य सहाय्यक डॉ. एस. यु. चंद्रशेखर, विस्तार आरोग्य अधिकारी जे.बी. उमाळे, लेखाधिकारी विजय नाईकवाडे, कनिष्ठ सहाय्यक जी.आर. धांडे, किटकशास्त्रज्ञ ममता कुटे, नागरी आरोग्य विशेषज्ञ डॉ. माधव हिवाळे, सिकलसेल सहाय्यक भारत पारवे, कुष्ठरोग सहाय्यक निलेश राठोड, संगणक चालक राहुल बाजड यांची उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण केले. त्यानंतर सर्वांनी अभिवादन केले. आपल्या मनोगतातून डॉ. रामहरी बेले यांनी महामानवांच्या कार्याची माहिती दिली. जगात सर्वश्रेष्ठ असे भारतीय संविधान लिहून बाबासाहेबांनी समस्त भारतीयांवर उपकार केले आहेत. तसेच युगानुयुगे गुलामगिरीत खितपत पडलेल्या समाजाला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला.

त्यांचे विचार आजही समाजाला व संपुर्ण जगाला प्रेरणादायी असून आज इतर देशही बाबासाहेबांच्या स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या विचारावर चालून आपल्या देशाचा विकास करीत आहेत. त्यामुळे समस्त भारतीयांनी त्यांच्या विचारावर चालून आपले जीवन सुकर करावे असे आवाहन डॉ. रामहरी बेले यांनी केले. डॉ. माधव हिवाळे यांनी आपल्या मनोगतातून युवा पिढीने बाबासाहेबांच्या विचारावर चालून आपल्या परिवाराच्या, समाजाच्या व देशाच्या प्रगतीला हातभार लावावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निलेश राठोड यांनी तर उपस्थितांचे आभार राहुल बाजड यांनी मानले. ता.प्र.



## कॅन्डल मार्च काढुन महामानवास अभिवादन



रिसोड : भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रिसोड शहरातुन कॅन्डल मार्च काढुन अभिवादन करण्यात आले. विहारात सकाळी ५.००वा तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्ती व प्रतिमाना पुष्प व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामुहीक त्रिशरण पंचशील घेऊन

सकाळी ५.३०वा संबोधी बुद्ध विहार एकता नगर रिसोड येथुन अभिवादन रॅलीला सुरुवात झाली. जिजाऊ चौकात माँ जिजाऊ च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सिव्हिल लाईन मार्गे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्रिशरण पंचशील घेण्यात आलेपंचशील चौक येथे सुद्धा बाबासाहेबाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. लोणी रोड मार्गे सम्राट चौकात सुद्धा बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. समारोप संबोधी बुद्ध विहार येथे काही मान्यवरांनी बाबासाहेबांना शाब्दातुन आंदराजली अर्पण केली तर काहीनी गीतातुन महापरिनिर्वाण दिनानिमित्त गीतातुन अभिवादन केल या कॅन्डल मार्च मध्ये भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी तसेच सुभेदार रामजी बाबा ट्रस्टचे पदाधिकारी, विहार बांधकाम समीती पदाधिकारी आणि उपासक ,उपासिका व मुलं,मुली बहुसंख्येने सहभागी झाले होते.

शेवटी सरणतय घेऊन बाबासाहेबांना आदराजंली अर्पण करण्यात आली. श.प्र.

## ■ जिल्हाधिकाऱ्यांनी केला ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ
## ■ उत्कृष्ट संकलन करणाऱ्या अधिकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव

# सैनिकांमुळे देश सुरक्षित - बुवनेश्वरी एस.





वाशिम,दि.९ डिसेंबर (जिमाका) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने आयोजित केलेल्या ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.यांच्या हस्ते आज ९ डिसेंबर रोजी जिल्हा नियोजन समिति सभागृहात आयोजित कार्यक्रमात करण्यात आला.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन शहिदांच्या स्मृतीचिन्हास श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी पुष्पहार अर्पण केला.यावेळी मान्यवरांसह सभागृहात उपस्थित असलेल्या व्यक्तींनी जागेवर उभे राहून शहिदांना श्रध्दांजली अर्पण केली.

जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी शहिद शिपाई यशवंत सरकटे यांच्या वीरपत्नी श्रीमती शांताबाई सरकटे,शहिद शिपाई दगडू लहाणे यांच्या वीरपत्नी श्रीमती पार्वतीबाई लहाणे व शहिद नायक अमोल गोरे यांच्या वीरपत्नी श्रीमती वैशाली गोरे ,वीर पत्नी मीराबाई नागुलकर यांचा साडीचोळी देऊन सत्कार केला. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४ निधी संकलन शुभारंभाप्रसंगी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह मंचावर उपस्थित असलेल्या मान्यवरांनी सशस्त्र सेना ध्वज प्रदान करुन निधी संकलनाची सुरुवात केली.शासनाने सन २०२४ या वर्षाकरीता जिल्हयाला ४८ लक्ष रुपये सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट दिले होते. जिल्हयातील विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये,शाळा, महाविद्यालये तसेच विविध संघटनांच्या योगदानातून जिल्हयाने १२० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले. जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी यावेळी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमाची घोषणा केली.देशाचे रक्षण करतांना विरगती प्राप्त झालेल्या शुरवीर सैनिक हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यासाठी तसेच युध्दात लढतांना ज्या सैनिकांना अपंगत्व आले आहे,अशा सैनिकांच्या कुटूंबियांच्या मदतीसाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलीत करण्यात येतो.जिल्हयातील नागरीकांनी भारतीय सैनिकांच्या मदतीसाठी तन मन धनाने पुढे यावे असे आवाहन श्रीमती बुवनेश्वरी यांनी यावेळी केले. सशस्त्र सेना ध्वजदिन २०२३ चे उत्कृष्ट निधी संकलनाप्रित्यर्थ राज्य शासनाकडून प्राप्त झालेले स्मृतीचिन्ह जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांना निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विश्वनाथ घुगे यांनी प्रदान केले.

यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्याहस्ते इयत्ता १० वी मध्ये ९६ टक्के गुण मिळाल्याबद्दल कृष्णा राठोड हिचा विशेष गौरव पुरस्कारांतर्गत धनादेश वाटप करण्यात आले. व मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट ध्वजदिन निधी संकलन केल्याबद्दल अधिकारी व कर्मचारी यांचा प्रशस्तीपत्र व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

प्रारंभी कल्याण संघटक संजय देशपांडे यांनी माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती यावेळी दिली.तसेच प्रधानमंत्री , राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल यांच्या संदेशाचे वाचन केले. यावेळी विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची,माजी सैनिकांची तसेच माजी सैनिकांचे कुटूंबिय व विविध क्षेत्रातील व्यक्तींची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विश्वनाथ घुगे यांनी केले.सुत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी तर उपस्थितांचे आभार कॅप्टन संजय यलमर यांनी मानले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमात बाकलीवाल विद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, सैनिक कल्याण कार्यालय कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

## जिल्हाधिकारी कार्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी

वाशिम, दि. ८ डिसेंबर (जिमाका): संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात आज साजरी करण्यात आली. राजे वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हा प्रशासनाच्यावतीने संत संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन करण्यात आले. सहायक अधीक्षक अनिल घोडे यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# भा.मा. कन्या शाळेत परख राष्ट्रीय सर्वेक्षण



रिसोड : परख राष्ट्रीय सर्वेक्षण परीक्षा ४ डिसेंबर रोजी घेण्यात आली यामध्ये ७४२ जिल्ह्यातील ८८ हजार शाळांमधील सुमारे २३ लाख विद्यार्थी सहभागी झाले होते. शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार तीन वर्षाच्या सायकल कालावधीसह इयत्ता तिसरी,पाचवी, आठवी आणि दहावीसाठी नमुना आधारित नॅशनल अचीवमेंट सर्वे (ए) रोलिंग कार्यक्रम राबवत आहे.

या परीक्षेचा एक भाग म्हणून दिनांक ४ डिसेंबर रोजी भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे इयत्ता नववीतील ७८ विद्यार्थिनीपैकी रॅंडम पद्धतीने परीक्षेसाठी ३० विद्यार्थिनीची निवड करण्यात आली . ही परीक्षा भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या आदरणीय प्राचार्या मंजुषा सु. देशमुख मॅडम यांच्या मार्गदर्शना अंतर्गत पारदर्शक पद्धतीने घेण्यात आली असून त्यासाठी बाह्य परीक्षक म्हणून सौ. शारदा साळवे मॅडम व श्री. भागवत मापारी सर उत्कृष्ट रित्या काम बघितले .

## संपादकीय

# स्वस्थ समाजाकरिता प्रमाणबद्ध प्रजनन दर आवश्यक

गेल्या महिन्यात नागपुरात कठाळे कुल संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनात देशभरातून ४०० पेक्षा अधिक कुटुंबीय सहभागी झाले होते. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी भारतातील एकूण प्रजनन दर २.१ च्या खाली गेल्याबद्दल चिंता व्यक्तकेली होती. सरसंघचालक म्हणाले की, बदली दरापेक्षा टीएफआर (टोटल फर्टिलिटी रेट) कमी होणे म्हणजे समाजाचे अस्तित्व कोणीही नष्ट केल्याशिवाय आपोआप संपुष्टात येऊ शकते. त्यामुळे आपला समाज दीर्घकाळात नामशेष होण्याचा धोका आहे, जे मोठ्या चिंतेचे कारण आहे. त्यांनी म्हटले आहे की टीएफआर कोणत्याही परिस्थितीत २.१ च्या खाली येऊ नये. सरसंघचालकांनी विधान पहिल्यांदाच केलेले नाही. यापूर्वीचे सरसंघचालक स्व. श्री. सुदर्शनजी यांनी देखील असे विधान काही वर्षांपूर्वी केलेले होते आणि तेव्हा देखील तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. संघाप्रमाणेच संघ प्रेरित संघटनांमध्ये देखील सरसंघचालकांचे मार्गदर्शन आणि विविध प्रसंगी केलेल्या सूचना यावर गांभीर्याने अध्ययन आणि चर्चा होत असतात.

स्वदेशी जागरण मंचाच्या बैठकीतून या विषयावर यापूर्वी कार्यकर्त्यांचे अनेकदा प्रबोधन करण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर स्वदेशी जागरण मंचने लखनौ येथे जून २०२४ मध्ये झालेल्या राष्ट्रीय परिषदेच्या बैठकीत या संदर्भात एक ठराव देखील संमत केला होता. झपाट्याने कमी होत असलेला एकूण प्रजनन दर (टीएफआर), म्हणजे सरासरी १५-४९ वर्षे वयाची महिला तिच्या आयुष्यात किती मुलांची निर्मिती करते, भविष्यातील लोकसंख्येचा आकार, ज्यामध्ये घट होण्याची अपेक्षा आहे, आणि आपला समाज व्यक्त करतो अशा त्याच्या अस्तित्वावर होणाऱ्या परिणामांबद्दल हे लक्षात घेण्यासारखे आहे की लॅन्सेटने आपल्या ताज्या प्रकाशनात २०२१ सालापर्यंत भारताचा टीएफआर १.९१ पर्यंत कमी झाल्याचे सांगितले होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



रिसोड : उत्तमचंद बगडिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुलकर्णी तर प्रमुख वक्ते म्हणून पत्रकार रवा अंभोरे हे होते . कार्यक्रमाचे आयोजन एनएसएस विभागप्रमुखप्रा. डॉ. ए. जी. वानखडे यांनी केले होते.

प्राचार्यडॉ. विनोद कुलकर्णी यांनी आपल्या अध्यक्ष भाषणातून डॉ आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात अस्पृश्य समाजात' स्व' ची जाणीव करणारे क्रांतिकारक महापुरुष मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, प्रबुद्ध भारत इत्यादी होते. कास्ट इन इंडिया, अनिहिलेशन ऑफ कॉस्टस, स्मॉल होल्डींग इन इंडिया, हुवेअर द शुद्राज, थॉट्स ऑन पाकिस्तान, बुद्ध आणि त्यांचा धम्म हे त्यांचे जगप्रसिद्ध ग्रंथ आहेत स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री होते 'भारतरत्न' या सर्वश्रेष्ठ सन्मानाने त्यांना सन्मानित केल्या गेले आहे असे सांगितले. प्रमुख वक्ते रवी अंभोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज व्यवस्थेत बळी पडलेल्या दलित, शोषित जनतेला मानवी हक्क व अधिकाराची जाणीव करून देणारी महापुरुष म्हणून परिचित आहे. आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा विधीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास् इत्यादी ज्ञानशाखावरिल अधिकार सर्वमान्य आहे सात नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जातो कारण याच दिवशी या महामानवाचा शाळेत प्रवेशाचा पहिला दिवस होता आणि हीच खरी इतिहासाची कुस बदलणारी घटना ठरली . कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनएसएस प्रमुख प्रा डॉ. ए. जी. वानखेडे यांनी केले .

संचालन प्रा. डॉ. एम. पी. खेडेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी साठी इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. बुधवंत व राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नंदेश्वर व रासेयोच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाला प्रा. टिकार, प्रा. डॉ. मेश्राम, प्रा. मुंढे, प्रा. कदम, प्रा. पांढरे, प्रा. डॉ नरवाडे, प्रा. काळे मॅडम, प्रा. वानरे, प्रा. संदिप जुनघरे, प्रा राम जुनघरे, प्रा. बाजड, प्रा. साबळे, प्रा. पाठक मॅडम, प्रा बोंडे मॅडम, प्रा. प्रजापती, मालवे मॅडम, श्री पुरी, घुगे, पांडे, जमदाडे, मानमोठे मॅडम, सुनिल चराटे, राटे, गजू जाधव, सुरज नरवाडे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. **श.प्र.**

# रिसोड येथे जागतिक एचआयव्ही एड्स दिनानिमित्त जनजागृती


रिसोड : जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अनिल कावरखे वाशिम यांच्या आदेशानुसार ६ डिसेंबर २०२४ रोजी रिसोड पोलीस स्टेशन येथून जय लखमा डीएमएलटी ॲंड पॅरामेडिकल कॉलेज रिसोड व आयुर्वेद महाविद्यालय देगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक एड्स दिनानिमित्त रिसोड शहरांमध्ये भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीमध्ये प्रमुख उपस्थिती व रॅली करता हिरवी झेंडी देण्यात आली. बाळासाहेब दराडे रिसोड नायब तहसीलदार प्रशांत पवार वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय रिसोड शिवचरण डोंगरे सहाय्यक पोलीस निरीक्षक रिसोड रिसोड नगरपरिषद मुख्य अधिकारी शेवदा साधनाताई गवळी पाटील संचालिका आयुर्वेद महाविद्यालय मांदळे वाशीम जिल्हाअध्यक्ष राज्य पत्रकार संघ अध्यक्ष निनाद देशमुख रिसोड तालुका अध्यक्ष अरुण क्षीरसागर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रिसोड रिसोड तालुका अध्यक्ष पत्रकार संघ सतीश मांदळे रवि भिसे जिल्हा पर्यवेक्षक जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा रुग्णालय वाशिम गोरे आयुर्वेद

आयुर्वेद महाविद्यालय देगाव येथील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी या जागतिक एड्स रॅली करता उपस्थित राहून रॅलीचे समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आले रिसोड येथील साईबाबा ऑटो चालक मालक युनियन चे अध्यक्ष व सर्व सदस्य जय लखमा ॲम्बुलन्स चालक यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



महाविद्यालय देगाव कॉलेज सहाय्यक प्राध्यापक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ वाशिम आरोग्य जिल्हा सेलचे अध्यक्ष केशव गरकळ संचालक सचिन गांजरे जय लखमा डीएमएलटी कॉलेज रिसोड संचालिका अर्चना सचिन गांजरे जय लखमा डी एम एल टी कॉलेज रिसोड गिरधर शेजुळ सरकटे सुधाकर निखाडे गायकवाड रिसोड येथील जय लखमा डीएमएलटी कॉलेजच्या विद्यार्थी विद्यार्थिनी रॅलीची सुरुवात रिसोड पोलीस स्टेशन ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते लोणी फाटा ते अण्णाभाऊ साठे चौक ते भाजी मंडी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रॅली काढण्यात आली. **श.प्र.**




**पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720**

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

**महाराष्ट्र शासन**

## जलसंपदा विभाग

## यांत्रिकी मंडळ, नागपूर

# कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १, जेल रोड अमरावती

**पिन कोड - ४४४६०२ यांचे कार्यालय**

**पत्ता : कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १, जेल रोड अमरावती पिन कोड - ४४४६०२**

**ई-मेल :** eegatcdiv1amt@gmail.com **दुरध्वनी क्र. : ०७२१-२६६१४५१**

## निविदा सुचना क्र. ३९ /सन २०२४-२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १, जेल रोड, अमरावती पिन कोड-४४४६०२**, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या **https:// wrd.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपल्बध आहे. खालील नमुद केलेल्या कामांच्या निविदा बी-१ नमून्यांत सिलबंद निविदा मागविण्यांत येत आहे. कोऱ्या निविदा कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे कार्यालयांत रकाना क्र. ९ मध्ये दर्शविल्यांप्रमाणे कार्यालयीन वेळेत देण्यांत येईल व रकाना क्र. १० मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे कार्यालयांत स्विकारले जातील आणि **शक्य झाल्यांस त्याच दिवशी उघडण्यांत येतील.** कोऱ्या निवीदा संचाचे शुल्क धनाकर्ष मार्फत स्विकारले जाणार आहे. धनाकर्ष कंत्राटदाराचे स्वतःचे बैंक खात्या मार्फत निर्गमित करण्यांत आलेले असावेत. धनाकर्ष कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे नावे असला पाहीजे याची कृपया नोंद घ्यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | अंदाजपत्रकीय (GST रक्कम व Insurance वगळुन) | इसारा रक्कम | प्रारंभिक सुरक्षा ठेव रक्कम | कामाची मुदत | निविदा शुल्क (GST सहीत) | निविदा विक्रीचा कालावधी | निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | कंत्राटदाराचा वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | **टणका बॅरेज** वरील थोपव्दारे आकार १० - X १.३ मी. ३ संच व गोलीएथ क्रेन २० मेटल क्षमतेच्या गोलीएथ क्रेन चे आवश्यक घटक भागास गंजरोधक, रंगकामे करणे, हॉरिझोन्टल व गोलिएथ चे वरच्या बाजुस ड्रेन होल करणे, वायर रोपला कार्डीयम कंपाऊंड लावणे, विद्युत विषक दुरुस्ती कामे व इतर अनुषंगिक दुरुस्ती कामे. | वाशिम | रु. ४,५४,४३३/- | ४६००/- | ४६००/- | ०२ महिना | रु.११८०/- | दिनांक ०५/२/२०२४ पासून दिनांक १२/१२/२०२४ पर्यत (कार्यालयीन वेळेत) | दिनांक १२/२/२०२४ १८.०० वाजेपर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ : दि. १३/१२/२०२४ (स. ११.०० वा.) | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४ /१७/ यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. | |
| २ | **वरुड बॅरेज** वरील थोपव्दारे आकार १० - X १.३ मी. ४ संच व गोलीएथ क्रेन २० मेटल क्षमतेच्या गोलीएथ क्रेनचे आवश्यक घटक भागास गंजरोधक रंगकामे करणे, हॉरिझोन्टल व गोलिएथ चे वरच्या बाजुस ड्रेन होल करणे, वायर रोप ड्रम व गोलीएथ क्रेनचे क्रॉस ट्रॅव्हल व स्ट्रेट ट्रॅव्हल्स असेंम्ब्लीचे रोलर करीता कव्हर करणे, ट्रॅक रोलर स्वच्छ करुन वंगन व स्नेहन करणे, वायर रोपला कार्डीयम कंपाऊंड लावणे, विद्युत विषक दुरुस्ती कामे व इतर अनुषंगिक दुरुस्ती कामे. | वाशिम | रु. ५,१९,०७७/- | ५२००/- | ५२००/- | ०२ महिना | रु.११८०/- | दिनांक ०५/२/२०२४ पासून दिनांक १२/१२/२०२४ पर्यत (कार्यालयीन वेळेत) | दिनांक १२/२/२०२४ १८.०० वाजेपर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ : दि. १३/१२/२०२४ (स. ११.०० वा.) | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४ /१७/ यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. | |
| ३ | **ढिल्ली बॅरेज** वरील थोपव्दारे आकार १० - X १.३ मी. ५ संचाचे आवश्यक घटक भागास गंजरोधक रंगकामे करणे, हॉरिझोन्टल व गोलिएथ चे वरच्या बाजुस ड्रेन होल करणे, वायर रोप ड्रम व गोलीएथ क्रेनचे क्रॉस ट्रॅव्हल व स्ट्रेट ट्रॅव्हल्स असेंम्ब्लीचे रोलर करीता कव्हर करणे, वायर रोपला कार्डीयम कंपाऊंड लावणे, विद्युत विषक दुरुस्ती कामे व इतर अनुषंगिक दुरुस्ती कामे. | वाशिम | रु. ५,१८,४११/- | ५२००/- | ५२००/- | ०२ महिना | रु.११८०/- | दिनांक ०५/२/२०२४ पासून दिनांक १२/१२/२०२४ पर्यत (कार्यालयीन वेळेत) | दिनांक १२/२/२०२४ १८.०० वाजेपर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ : दि. १३/१२/२०२४ (स. ११.०० वा.) | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४ /१७/ यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. | |
| ४ | **उकळी बॅरेज** वरील थोपव्दारे आकार १० - X १.३ मी. ५ संच व गोलिएथ क्रेन २० मेटल क्षमतेच्या गोलीएथ क्रेनचे आवश्यक घटक भागास गंजरोधक रंगकामे करणे, हॉरिझोन्टल व गोलिएथ चे वरच्या बाजुस ड्रेन होल करणे, वायर रोप ड्रम व गोलीएथ क्रेनचे क्रॉस ट्रॅव्हल व स्ट्रेट ट्रॅव्हल्स असेंम्ब्लीचे रोलर करीता कव्हर करणे, वायर रोपला कार्डीयम कंपाऊंड लावणे, विद्युत विषक दुरुस्ती कामे व इतर अनुषंगिक दुरुस्ती कामे. | वाशिम | रु. ५,६७,२५२/- | ५७००/- | ५७००/- | ०२ महिना | रु.११८०/- | दिनांक ०५/२/२०२४ पासून दिनांक १२/१२/२०२४ पर्यत (कार्यालयीन वेळेत) | दिनांक १२/२/२०२४ १८.०० वाजेपर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ : दि. १३/१२/२०२४ (स. ११.०० वा.) | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४ /१७/ यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. | |

(उर्वरीत पान ४ वर)

# भा.मा. शाळेत महापरिनिर्वाण दिन साजरा

**रिसोड :** भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा रिसोड येथे महापरिनिर्वाण दिन साजरा ६एप्रिल २०२४ शुक्रवारी भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा रिसोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे प्राचार्य भांडेकर होते, तर प्रमूख उपस्थिती मध्ये शाळेचे पर्यवेक्षक थोरात , जेष्ठ शिक्षक पत्रे मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी जवळपास चाळीस विद्यार्थ्यांनी भाषणांमधून विचार प्रगट केले. प्रमुख पाहुण्यांनी भाषणे झाली. आपल्या अध्यक्षीय



भाषणातून प्राचार्य भांडेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, शिक्षणाबदलची आस्था याविषयी मार्गदर्शन केले. शालेय जीवनात वाचनालयाचे महत्व यावर विषेश प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन श्री दिलीप देशमख यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. **(श. प्र.)**

# संत तुकाराम महाराज विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा



रिसोड : येथून जवळच असलेल्या संत तुकाराम महाराज विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव जाधव तर प्रमुख पाहुणे संस्थेचे संचालक शिवाजी ढेकळे हे होते कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो पूजनाने करण्यात आली. यावेळी काही विद्यार्थ्यांनी डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर माहिती दिली.

त्यामध्ये वर्ग १० वी मधून स्नेहा साहेबराव शेजुळ, वर्ग आठवी मधून रोशनी कांबळे, पल्लवी वर्ग सातवी मधून अस्मिता जाधव ,वैष्णवी कांबळे ,सुरज शेजुळ, व प्राची सभादिंडे,आदिती पढघान ,अर्पिता शेजुळ व बारावी मधून आरती शेजुळ, पायल शेजुळ, कोमल कांबळे विद्यार्थिनींनी गीत गायन केले. यावेळी प्रा. राजु अंभोरे, बद्रीनाथ फड,व रेखा चाटसे मॅडम व मनोज जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व परसराम देवकर यांनी गीत गायन केले. यावेळी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन वर्ग नववीची स्नेहल ढवणे हिने व आभार प्रणिता वाकळे हीने मानले. **श.प्र.**

(उर्वरीत पान ३ वरुन पुढे)

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | अंदाजपत्रकीय (GST रक्कम व Insurance वगळुन) | इसारा रक्कम | प्रारंभिक सुरक्षा ठेव रक्कम | कामाची मुदत | निविदा शुल्क (GST सहीत) | निविदा विक्रीचा कालावधी | निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | कंत्राटदाराचा वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ५ | **जयपुर बॅरेज** वरील थोपद्वारे आकार- १० X १.३ मी ५ संच व गोलीएथ क्रेन २० मेटल क्षमतेच्या गोलीएथ क्रेन चे आवश्यक घटक भागास गंजरोधक रंगकामे करणे, हॉरिझोन्टल व गोलिएथ चे वरच्या बाजुस ड्रेन होल करणे, वायर रोप ड्रम व गोलीएथ क्रेनचे क्रॉस ट्रॅव्हल व स्ट्रेट ट्रॅव्हल्स असेंम्ब्लीचे रोलर करीता कव्हर करणे, वायर रोपला कार्डीयम कंपाऊंड लावणे, विद्युत विषक दुरुस्ती कामे व इतर अनुषंगिक दुरुस्ती कामे. | वाशिम | रु. ५,८०,२९१/- | ५९००/- | ५९००/- | ०२ महिना | रु.११८०/- | दिनांक ०५/१२/२०२४ पासून दिनांक १२/१२/२०२४ पर्यत (कार्यालयीन वेळेत) | दिनांक १२/२/२०२४ १८.०० वाजेपर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ : दि. १३/१२/२०२४ (स. ११.०० वा.) | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/ प्र.क्र.१०४ /१७/ यांत्रिको दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. | |
| ६ | **कोकलगाव बॅरेज** वरील थोपद्वारे आकार-१० X १.३ मी ४ संच व गोलीएथ क्रेन २० मेटल क्षमतेच्या गोलीएथ क्रेन चे आवश्यक घटक भागास गंजरोधक रंगकामे करणे, हॉरिझोन्टल व गोलिएथ चे वरच्या बाजुस ड्रेन होल करणे, वायर रोप ड्रम व गोलीएथ क्रेनचे क्रॉस ट्रॅव्हल व स्ट्रेट ट्रॅव्हल्स असेंम्ब्लीचे रोलर करीता कव्हर करणे, ट्रंक रोलर स्वच्छ करुन वंगन व स्नेहन करणे, वायर रोपला कार्डीयम कंपाऊंड लावणे, विद्युत विषक दुरुस्ती कामे व इतर अनुषंगिक दुरुस्ती कामे. | वाशिम | रु. ५,३३,५८५/- | ५४००/- | ५४००/- | ०२ महिना | रु.११८०/- | दिनांक ०५/१२/२०२४ पासून दिनांक १२/१२/२०२४ पर्यत (कार्यालयीन वेळेत) | दिनांक १२/२/२०२४ १८.०० वाजेपर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ : दि. १३/१२/२०२४ (स. ११.०० वा.) | महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/ प्र.क्र.१०४ /१७/ यांत्रिको दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही. | |

**अटी व शर्ती :-** १) कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, अमरावती यांचे कार्यालयात सूचना फलक, नियमानुसार वृत्तपत्रे व www.mahayantriki.gov.in या website सविस्तर सूचना पाहावयास मिळेल. २) कोणतेही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्यांचा हक्क हे कार्यालय राखून ठेवत आहे. ३) वरील अंदाजपत्रकीय रक्कम GST व Insurance वगळून सर्व करासहीत एकत्रित असुन शासकीय नियमाप्रमाणे कर भरणाची जबाबदारी निविदाकाराची असून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास देयकातून कपात करण्यांत येईल व नियमानुसार भूगतान करण्यांत येईल. GST ची रक्कम कंत्राटदारास वेगळे देय राहील. ४) सदर निविदा सुचनेतील कामाकरीता संभाव्य कंत्राटदारांनी कोरे निविदा संचासोबत खालिलप्रमाणे कागदपत्रे निविदा भरतांना सादर करणे आवश्यक राहील. a) Attested xerox copy of valid GST registration certificate alongwith previous month GSTR 3B return. (b) Income Tax Return for Financial Year 2023-24. (c) Term Deposit Receipt for 12 Months of any schedled Bank for the amount of earnest money. (d) PAN Card. (e) Aadhar Card. (f) Contractor should attached an Affidavit on Rs. 100/- stamp paper about the correctness and validity of all paper attached/submitted in Tender, duly attested by The Govt. authorized agencies i. e. Setu / Notorial, not below the rank Executive Magistrate. (शासन निर्णय सा.बां. विभाग क्र. सीएटी/२०१८/प्र.क्र.१२७/इमा-२ दिनांक २८/११/२०१८ मधील परिशिष्ट १) (g) Declaration of the contractor as per Appendix "E" as mentioned on the Page No. 29 of the Blank Tender Booklet on letter head. ५) सदर निविदा सूचनेतील कामांकरीता कंत्राटदारांची Bid Capacity लागु राहील व त्यास्तव उपरोक्त परिच्छेद अ.क्र. ४ मध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांव्यतीरिक्त खालिलप्रमाणे कागदपत्रे कंत्राटदाराने निविदा भरतांना सादर करणे आवश्यक राहील:- (a) List of works in hand and works tendered along with supporting certificates. (b) List of plants and Machinery to be deployed at work site in the form of self attested on letter head. (c) List of Technical Persons to be deployed at work site in the form of self attested on letter head. (d) Attested copy of Scanned from original copy of Turnover Certificate of last five years, duly issued by chartered accountant and supported with ITR & Balance sheet with Profit & loss statement for last five years (Since FY 2019-20 to FY 2023-24). Figures in Annual Turnover Certificate should be matched / in accordance with figures in profit & loss statement. UDIN number is mandatory.

जा.क्र. /२२०५/व्दानिवडविक्र. १/अम./निविदा शाखा/२०२४

कार्यालय : कार्यकारी अभियंता, व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १, जेल रोड अमरावती दिनांक -२९/११/२०२४

विमाका/अम/जाहि./८०७/२०२४-२०२५

प्रत : कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे, जलसंपत्ती भवन, कर्वे पुतळयाशेजारी, कोथरुड, पुणे-४११०३८ यांना माहितीस्तव समादराने अग्रेषीत.

सदर निविदा सुचना यांत्रिकी संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांस आपणांस विनंती करण्यांत येत आहे.

सहपत्र: निविदा सूचना क्र. ३९ सन २०२४-२५ ०१ प्रतीत.

प्रत: कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती व उभारणी विभाग क्र.१, जेल रोड, अमरावती यांचे कार्यालयातील सुचना फलक.

सहपत्र: निविदा सूचना क्र. ३९ सन २०२४-२५ : ०१ प्रतीत.

स्वाक्षरीत/-
**(गणेश म. भगत)**
कार्यकारी अभियंता
व्दार निर्मिती व उभारणी विभाग क्र. १,
जेल रोड, अमरावती